# माया पंडित यांच्या चार कविता

### सावलीतल्या पडछायांना

सावलीतल्या पडछायांना
उन्ह चांदणे आता चिल्लर
अंधारी या टपून बसले
पिंडीवरती कोण सहोदर.

पुसून बाई टाकी ओळख
रिती करी आसेची ओंजळ
विसर पराव्या जुल्माचे भय
ठेव देव बाजारी मांडून.

अशीच कोठे मुरून जाईल
परोक्ष भयभीताची नियती
दुबळ्यांच्या डोईवर रुतल्या
भक्कम इथल्या मग्रूर भिंती.

उखड पुराण्या काळजातुनी
पुरातनाच्या मुळ्या बिलंदर
कायावाचामनात्मनातिल
कपटचौकटी तोड भयंकर.

समूह जनांचे वोळत येती
वहात जा होऊन समांतर
जनांतरींच्या अवकाशांना
भिडून जा होउन कलंदर.

### काजळमाया

सभोवताली झुझाटझुंबड झडपतात कसल्या छाया
अस्मानातून अवचित भवती उतरतात काजळमाया.
गायब होती क्षणात दारे छप्पर खिडक्या नाहीशा
बाग नि अंगण, सोपा, भिंती, विरून गेल्या कुठे कशा?

हिरवेकाळे जंगल उठते सरसरून भवताली दाट
झाडाझाडोऱ्यात फुसफुसे लपलेली भयकारी वाट.
स्मृती पुरातन आदिम येती चहुबाजूंनी करुनी चाल
धुधाट्यात त्या वाहून जातो वर्तमान नि भविष्यकाल.

शिलंतास वाहती उसळत्या गतकाळांचे दुथडी पूर
वावटळींचा प्रळय भिनकता भये थर्थरे माझे ऊर.
हे कुठले पांडूर धुके फुंकते विखारी हवेत वास
सरते ओळख धडके छाती गुदमरलेले माझे श्वास.

वृक्षांखाली घालून फत्कल या कुठल्या बसल्या आवा
सात आसरा मुठीत झाकून लपवतात कसला कावा?
धुरळततरळत धुनीवरी वाकतो चेटक्या म्हातारा
गारा घासुनी रचतो वरती मिथ्य कथांचा डोलारा!

जाळ उसळता बुभुक्षितांचा कोलाहल भवती उठतो
भयंकराच्या भुजा उगारित झोंबी अंगाशी घेतो.
कसली चाहूल येते मागुन कोण कुणाची करी शिकार
हा कसला गल्बला कुणाच्या मरणाचा उठतो चित्कार.

नाचत थयथय छेदित धुरळा पिंगा घालत भाल्यांनी
ओढून आणी कोण कुणाचे छिन्न कलेवर हातांनी.
खर्जामधली घर्घर झाडांच्या मागुन येते ऐकू
सावज हेरून झडप घालण्या टपून बसला कोण पशू.

भयचकित थिजते, पुसते या पसाऱ्यात मी कशी कुठे
मीच शिकारी, बळी मीच का, वाहु कसे भलते ओझे?
असाच का रे असेल उठला भवितव्याचा भाळी लेख
मानुषतेची हिंस्रपणाशी कारे जुळते असली मेख?

कुणी ओढली काळामधुनी पाशवतेची अखंड रेघ
तुझ्या नि माझ्या इतिहासांचा असला कसला हा आलेख?

## आभाळात टांगलेलं ऊन

आभाळात टांगलेलं ऊन
सावल्यांच्या दोरांना
धरून सरकत रहातं पुढे पुढे
कवडशांच्या फिसलत्या पृष्ठभागावर
कोवळ्या तृणपात्यांची धावपळ
झेलायला किरणांचे तलम तिढे

अशा अभोगी वेळेस मी मी नाही रहात,
मी तू होत जाते
माझ्यातून छाटलेली सारी उलघाल
तुझ्या रूपात तरोतेज परतून येते.
येते कहाणी होऊन हिरव्या गुणांची
गाणी होऊन माझ्या अलक्षणांची.

तुझ्यातून फुटलेले तीव्र तणावे
इथल्या चौकटीत चिणलेल्या मला
खेचतात बाहेर
निळ्या नभाचे पंख लावून;
त्यांच्या दयेची भीक मागणाऱ्या
माझ्या अपेशांच्या
नेभळ्या उलथ्यापशातून!

मला समजू येत नाही अजून
की कसे बरसतात बये
तुझ्या कर्तेपणाचे कारूणिक मेघ!
अलत्याभलत्यांच्या गुर्मट अरेरावीला
कनवटीला खोचत
चिरून टाकते तुझ्या विजेची रेघ.

तुझ्या खांद्यावरचे रावे होऊन
माझी थिजलेली स्वप्ने झुलतात
तुझ्या शब्दाशब्दातल्या तोरणांचे दिवे
माझ्या गाडलेल्या अकराव्या दिशेची
वाट अचूक खोलतात.
माझ्या अंधारात लटकणाऱ्या वैखरीवरती
उजेडाचे कोवळे कोंब पेरतात.

## बोलीकबूली केली...झाली!

बोलीकबूली केली...झाली!
बुरीसबूरी निमूट प्याली
उरे भिरभिरे क्षणैक हृदयी
उन्मळणारे भंगुर वादळ

वियोग आता असा उन्मळे
निसदिन उलगे जन्माचे घर
मजबूरन खचती रचलेले
अभिलाषांचे थरावरी थर

कुठे कुणाच्या जुळती काया
कुठे खिन्न झुरत्या पडछाया
अलगावांचे घाव उरावर
झाकोळत ये काळी माया

**माया पंडित**
हैदराबाद